**<u>ठळक बातम्या</u>**

- QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत देशातल्या ५४ विद्यापीठांचा समावेश, IIT मुंबईसह पुणे आणि मुंबई विद्यापीठ पहिल्या २० मध्ये

- भूसंपादन वेळापत्रकानुसार पूर्ण करून महत्त्वाचे प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचे निर्देश

- अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर सोलापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**आणि**

- राज्याच्या अनेक भागात जोरदार पाऊस, कोकणात काही नद्या धोका पातळीवर

**<><><><>**

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत ५४ भारतीय शैक्षणिक संस्थांना स्थान मिळालं आहे. यात IIT मुंबई, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाचा समावेश आहे. देशपातळीवरील QS वर्ल्ड युनिव्हर्सिटी क्रमवारीत IIT दिल्लीनं अव्वल स्थान मिळवलं आहे.

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीनुसार जागतिक पातळीवर IIT दिल्लीनं १२३वा क्रमांक मिळवला आहे. आधीच्या क्रमवारीत IIT दीडशेव्या स्थानी होती. जागतिक पातळीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५६६ व्या स्थानी आहे, तर मुंबई विद्यापीठ ६६४ व्या क्रमांकावर आहे. देशपातळीवर ही विद्यापीठे अनुक्रमे १५ व्या आणि १८ व्या स्थानी आहेत.

QS जागतिक विद्यापीठ क्रमवारीत भारतीय शैक्षणिक संस्थांचा समावेश झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर केलेल्या संदेशाला उत्तर देत त्यांनी लिहिलं आहे की, QS जागतिक विद्यापीठ २०२६ अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर देशातील शैक्षणिक विश्वासाठी चांगली बातमी मिळाली आहे.

२०१४ मध्ये केवळ ११ भारतीय विद्यापीठांना QS क्रमवारीत स्थान होतं आता या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><>**

राज्यातल्या महत्वाच्या सर्व प्रकल्पांचं भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. राज्यातल्या महत्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी आज मुंबईत वर्षा निवासस्थानी घेतला. त्यात शक्तीपीठ महामार्ग, पुणे रिंग रोड यासह विविध प्रकल्पांचा समावेश आहे.  भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या..

प्रकल्प रखडल्यामुळे त्याच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ होते. त्यामुळे भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणांना टाईमलाईन दिलेली आहे. त्याचं तंतोतंत पालन करावं, सर्व यंत्रणा आणि संबंधित अधिकाऱ्यांनी मिशन मोडवर काम करावं. सर्वांनी गुणात्मक आणि रचनात्मक काम करावं, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**<><><>**

बडोदा संस्थानाचे महाराज सयाजीराव गायकवाड यांचे आणि महाराष्ट्राचे ऋणानुबंध होते. त्यामुळे ऐतिहासिक दस्तऐवजांची देवाणघेवाण आवश्यक असल्यानं गुजरात आणि महाराष्ट्राच्या पुराभिलेखागार यांनी सामंजस्य करार करावा, अशा  सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड आशिष शेलार यांनी आज दिले. मंत्रालयात पुराभिलेखागार विभागाच्या बैठकीत ते बोलत होते.

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या मातोश्री महाराणी जमनाबाई गायकवाड यांचं माहेर सातारा जिल्ह्यात रहिमतपूर इथं आहे. त्या ठिकाणी जमनाबाई यांचं स्मारक उभारण्याची मागणी होत आहे. यासंदर्भातही आजच्या बैठकीत चर्चा झाली. त्यावेळी स्मारकाबाबतचा आराखडा सादर करण्याच्या सूचना शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**<><><>**

राज्यात प्रयोगात्मक कलांचं सखोल संशोधन आणि अभ्यास करता यावा म्हणून राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे पु. ल. देशपांडे कला अकादमीत स्वतंत्र संशोधन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या केंद्राला शाहीर साबळे यांचं नाव देण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज दिली.

<><><><>

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आज आळंदी इथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. यंदा पालखी प्रस्थान सोहळा रात्री आठच्या सुमारास होणार आहे. या सोहळ्यासाठी अलंकापुरी सजली असून हजारो वारकरी आळंदीमध्ये दाखल झाले आहेत.

संतशिरोमणी तुकाराम महाराजांची पालखी आज आकुर्डीत विसावणार आहे. "सुरक्षित वारी, अखंड सेवा!" या भावनेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज आहेत. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी ७ सदस्यांचं विशेष प्रशिक्षित पथक वारी दरम्यान नेमण्यात आलं आहे.

<><><><>

गेल्या अकरा वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एक शक्तिशाली, सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून भारत जगभरात नावाजला जात आहे; असे गौरवोद्गार केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात काढले. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोनं पालखी मार्गांवर फिरत्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या अंतर्गत दोन चित्ररथांचं उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारुड, अभंग, गवळण यासारख्या महाराष्ट्राच्या लोककलांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देण्यात आली.

<><><><>

अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर आज सोलापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. काल संध्याकाळी चित्तमपल्ली यांचं वार्धक्यानं निधन झालं. ते ९४ व्या वर्षांचे होते. आज अक्कलकोट मार्गावरच्या निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. अंत्यसंस्काराच्या वेळी पोलीस दलानं बंदुकीच्या तीन फैरी हवेत झाडून त्यांना मानवंदना दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी

चित्तमपल्ली यांच्या पार्थिवावर पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. स्थानिक आमदार, वरीष्ठ सरकारी अधिकारी, तसंच साहित्यिक, मित्रपरिवार मोठ्या संख्येनं यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

यंदा साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनानिमित्त राज्यात विविध जिल्ह्यात कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. याच दिवशी योगिनी स्मार्त एकादशी आणि जागतिक संगीत दिन असल्यामुळे **सांगली जिल्हा परिषदेने** विश्व योग दर्शन यांच्या सहकार्यानं एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. सांगलीतल्या छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम इथं मुख्य केंद्राच्या माध्यमातून आभासी पद्धतीनं एकाच तालावर आणि एकाच वेळी योगासनं करण्यात येणार आहेत. याविषयी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या.....

**- होल्ड बाईट - तृप्ती धोडमिसे -**

**नाशिक** जिल्ह्यात योगदिनानिमित्त महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठानं भव्य योग जनजागृती सत्राचं आयोजन केलं आहे. आतापर्यंत या अभियानाच्या माध्यमातून नाशिकमधल्या ५ हजारांपेक्षा जास्त कुटुंबासाठी मोफत योग सत्रांचं आयोजन करण्यात आलं. योग दिनी होणाऱ्या सत्रातही सर्वांनी सहभागी होण्याचं आवाहन विद्यापीठाने केलं आहे.

**<><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासात कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. मराठवाडा आणि विदर्भातही पावसाने हजेरी लावली. राज्यात गेल्या चोवीस तासात १ सेंटीमीटरपेक्षा जास्त पाऊस पडल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. राज्यभरातल्या पावसाची अधिक माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- होल्ड - व्हाइस कास्ट -**

***नाशिक** जिल्ह्यातल्या सुरगणा तालुक्यातल्या उदमाळ गावात एक तरुण मासेमारी करताना वाहून गेला असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पुनद, दारणा धरण आणि नांदूरमध्यमेश्वर धरणातून विसर्ग सुरू असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षानं दिली.*

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१९ जून २०२५ - गुरूवार

***रायगड*** *जिल्ह्यात अंबा नदी आणि कुंडलिका नदी दुपारी धोका पातळीच्यावर वाहत होत्या. तर पाताळगंगा नदीनं इशारा पातळी ओलांडली होती. त्यामुळं प्रशासनानं नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसंच जिल्ह्यातल्या शाळांना आज सुट्टी जाहीर झाली होती.*

***रत्नागिरी*** *जिल्ह्याच्या उत्तरेकडच्या मंडणगड आणि खेड तालुक्यांमध्ये आज सकाळपासून जोरदार पाऊस झाला. त्यामुळे जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे.*

*प्रचंड पावसामुळे* ***खडकवासला*** *धरणातून ४ हजार क्युसेकहून अधिक विसर्ग सुरू होता.*

***पालघर, धुळे, सातारा जिल्ह्यातही चांगला पाऊस झाला. त्यामुळं पाणी पातळीत वाढ झाली.***

**<><><><>**

**मुंबई** इथं उद्या मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. कोकण, मराठवाड्यातील काही जिल्ह्यात तसंच विदर्भातल्या सर्व जिल्हयांमधे यलो अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक, पुणे, धुळे, छत्रपती संभाजीनगर, बीड इथं हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**